जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३६६ दिनांक - ०७/०९/२०२४

युनिट ३ गुन्हे शाखा,पुणे शहर

**चोरीच्या दुचाकी व ०७ मोबाईल हॅन्डसेट जप्त करुन**
**एकुण १,६०,०००/- रू. चा मुद्देमाल हस्तगत**

दि.०४/०९/२०२४ रोजी गुन्हे शाखा, युनिट ३ कडील पोलीस अंमलदार हे वारजे माळवाडी व उत्तमनगर पोलीस ठाणे हद्दित अवैध धंदयावर कारवाई करणेकरीता पेट्रोलींगकरीत असताना युनिट ३ कडील पोलीस अंमलदार प्रतिक मोरे यांना बातमी मिळाली की, विधीसंघर्षीत बालकाकडे चोरीची दुचाकी व चोरीचे मोबाईल हॅन्डसेट असून तो विक्रीकरीता आला असल्याची माहिती मिळाली. सदर विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेवून त्याचेकडून ०१ सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड व ०७ मोबाईल हॅन्डसेट मिळून आले. नमुद विधीसंघर्षीत बालकास विश्वासात घेवून केले तपासात त्याने आणखी एक केटिएम आर सी १५ ही दुचाकी चोरी केली असल्याचे सांगीतल्याने ती त्याचेकडून हस्तगत करण्यात आलेली आहे.

नमुद मिळून आलेल्या दुचाकी व मोबाईल हॅन्डसेटबाबत तपास करता सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेडबाबत चिखली पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुन्हा रजि. नंबर ५०३/२०२४ भा. न्या. सं. कलम ३०३(२) प्रमाणे तसेच केटिएम आर सी १५ बाबत सिंहगड रोड पोलीस ठाणे पुणे शहर गुन्हा रजि.नंबर १२५/२०२४ भादंविक ३७९ तसेच मिळाले मोबाईल हॅन्डसेटपैकी एक मोबाईल हॅन्डसेट हे उत्तमनगर पोलीस ठाणे,पुणे शहर गुन्हा रजि. नंबर १११/२०२४ भादंविक ३८० प्रमाणे असे तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत. उर्वरीत मोबाईल हॅन्डसेटबाबत तपास सुरू आहे. त्याचेकडुन एकुण १,६०,०००/-रु.किंमतीचा माल जप्त केला आहे.

सदरची कामगिरी ही सदरची कामगिरी, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पुणे शहर.श्री.निखिल पिंगळे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे १,श्री.गणेश इंगळे यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रंगराव पवार, पो.उपनिरीक्षक महेश कोकाटे तसेच पोलीस अंमलदार शरद वाकसे, सजिव कळंबे,केदार आढाव,गणेश सुतार,विनोद जाधव,सोनम नेवसे,सुजित पवार पोलीस अंमलदार प्रतिक मोरे,ज्ञानेश्वर चित्ते,गणेश शिदे,हरिश गायकवाड,राकेश टेकावडे,इसाक पठाण यांनी केली आहे.